**कृषि उन्नती योजना डिजीटल ॲग्रिकल्चर मिशन (ॲग्रिस्टॅक) अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गाचा पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : AAP -२०२६/प्र. क्र.२७/१० अे (१६६८४६७)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२

दिनांक : २२ मे, २०२६

**वाचा:-**

१. केंद्र शासनाच्या डिजीटल ॲग्रिकल्चर मिशन संदर्भातील मार्गदर्शक सुचना
२. शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. संकीर्ण-२०२४/प्र. क्र.१५७/१० अे, दिनांक १४.१०.२०२४
३. राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी समिती (SLSC) यांच्या ४२ व्या बैठकीचे इतिवृत्त दिनांक ११.०४.२०२६
४. केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे पत्र क्र. ०३/१४/२०२६- KY (E-१८६५५७), दि. २२.०४.२०२६ रोजीचे पत्र
५. केंद्र शासनाचे पत्र क्रमांक एफ नं.१९ (एमएच-६७०) दिनांक २३.०४.२०२६
६. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६
७. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. AAP-२०२६/प्र. क्र.२७/१०अे, (ई-१५५४५४२) दिनांक ०७.०५.२०२६ (प्रशासकीय मान्यता)
८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/ प्र.क्र.१०५/ अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या वाचा क्र. ४ येथील मान्यतेस अनुसरून, सन २०२६-२७ या वर्षाकरीता कृषि उन्नती योजनेंतर्गत डिजिटल क्रॉप सर्व्हे (ॲग्रिस्टॅक) या कार्यक्रमास केंद्र हिस्सा रु. ४०११.६० लक्ष (रुपये चाळीस कोटी अकरा लाख साठ हजार फक्त) व राज्य हिस्सा २६७४.४० लक्ष (रुपये सव्वीस कोटी चौऱ्याहत्तर लाख चाळीस हजार फक्त) अशा एकूण रु. ६६८६.०० (रुपये सहासष्ठ कोटी शहाऐंशी लाख फक्त) इतक्या रक्कमेच्या वार्षिक कृति आराखड्यास शासन निर्णय, दि. ०७ मे, २०२६ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

केंद्र शासनाने वाचा क्र. ५ येथील पत्रान्वये, सन २०२६-२७ मध्ये कृषि उन्नती योजना डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन अंतर्गत सन २०२६-२७ करीता डिजीटल क्रॉप सर्व्हे या घटकासाठी पहिल्या हप्त्यासाठी केंद्र शासनामार्फत मदर सॅक्शनद्वारे रु. १६,०४,६४,०००/-( रूपये सोळा कोटी चार लक्ष चौसष्ट हजार फक्त) इतका निधी प्राप्त झाला असुन उक्त निधीपैकी अनुसूचित जाती

प्रवर्गाकरीता केंद्र हिस्सा रू. १,८९,६६,८४५/- (रूपये एक कोटी एकोणनव्वद लक्ष सहासष्ट हजार आठशे पंचेचाळीस फक्त) इतका निधी उपलब्ध करून दिला आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कृषि उन्नती योजना-डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता केंद्र हिस्साच्या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पीत तरतुद विचारात घेता, कृषि उन्नती योजना-डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता प्राप्त मदत सँक्शन केंद्र हिस्सा रू.१,८९,६६,८४५/-(रूपये एक कोटी एकोणनव्वद लक्ष सहासष्ट हजार आठशे पंचेचाळीस फक्त) निधीपैकी केंद्र हिस्सा रू.१,४९,९८,०००/- (रूपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष अठ्ठ्यान्नव हजार फक्त) इतका निधी व त्याप्रमाणात राज्य हिस्सा (४० टक्के) रु.९९,९८,०००/- (रूपये नव्यान्नव लक्ष अठ्ठ्यान्नव हजार फक्त) असा एकूण रू.२,४९,९६,०००/- (रूपये दोन कोटी एकोणपन्नास लक्ष शहान्नव हजार फक्त) इतका निधी कृषि आयुक्तालयास वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात कृषि उन्नती योजना-डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता केंद्र हिस्सा रू.१,४९,९८,०००/- (रूपये एक कोटी एकोणपन्नास लक्ष अठ्ठ्यान्नव हजार फक्त) इतका निधी व त्या प्रमाणात राज्य हिस्सा (४० टक्के) रु.९९,९८,०००/- (रूपये नव्यान्नव लक्ष अठ्ठ्यान्नव हजार फक्त) असा एकूण रू.२,४९,९६,०००/- (रूपये दोन कोटी एकोणपन्नास लक्ष शहान्नव हजार फक्त) इतका निधी, सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीत निधीमधून खाली नमूद केल्याप्रमाणे कृषी आयुक्तालयास वितरीत करण्यात येत आहे.-

*(रक्कम प्रत्यक्षात)*

| **प्रवर्ग** | **केंद्र हिस्सा (६० टक्के)** | **राज्य हिस्सा (४० टक्के)** | **एकुण** |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | रू.१,४९,९८,०००/- | रु.९९,९८,०००/- | रू.२,४९,९६,०००/- |

२. सदर निधी प्रदान केलेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार खर्च करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी. या प्रित्यर्थ होणारा खर्च मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात येऊन पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

| **प्रवर्ग** | **केंद्र हिस्सा लेखाशिर्ष** | **राज्य हिस्सा लेखाशिर्ष** |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | मागणी क्रमांक एन-०३<br>२४०१-पीक संवर्धन,<br>(००)(७८९) अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना,<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना,<br>(०१) (३३) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा,<br>केंद्र हिस्सा-६० % (कार्यक्रम)<br>**(२४०१B ६९८),**<br>**३१-सहायक अनुदाने** | मागणी क्रमांक एन-०३<br>२४०१-पीक संवर्धन,<br>(००) (७८९) अनुसूचित जातीसाठी विशेष घटक योजना,<br>(०१) अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना,<br>(०१) (३४) शेतीसाठी डिजीटल सार्वजनिक पायाभूत सुविधा,<br>राज्य हिस्सा-४० % (कार्यक्रम)<br>**(२४०१B ७०४),**<br>**३१-सहायक अनुदाने** |

३. सदर योजना राबविताना खालील अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे.-

१. सदर योजना केंद्र शासनाच्या संदर्भाधीन मार्गदर्शक सूचनांनुसार व केंद्र शासनाच्या निधी वितरीत करण्याच्या अटी व शर्ती नुसार राबविण्यात यावी.
२. खर्चाचे लेखे सुव्यवस्थित ठेवुन सदर खर्चाचे लेखा परीक्षण अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्रे केंद्र व राज्य शासनाला लवकरात लवकर प्रगती अहवालासह सादर करण्यात यावेत.
३. योजनेच्या वेगवेगळ्या बाबींवरील भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल केंद्र व राज्य शासनास प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करण्यात यावा.
४. योजनेशी संबंधित ताळेबंद व लेखापरिक्षण जमा खर्चाच्या रकमा यांचा अहवाल अंमलबजावणी यंत्रणेने द्यावा. त्यामध्ये वर्षाच्या सुरुवातील अखर्चित रकमा व व्याजाद्वारे मिळालेले उत्पन्न स्पष्टपणे नमूद करण्यात यावे. जेणेकरून पारदर्शी स्वरुपात रकमा विचारात घेता येईल व सदिंग्धता राहणार नाही.
५. कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.
६. सदर योजनेकरीता मंजूर झालेला निधी हा ज्या संवर्गासाठी मंजूर केलेला आहे, त्याच संवर्गासाठी खर्च होईल, याची दक्षता घेण्यात यावी.
७. वाचा क्र. ४ व ५ येथील केंद्र शासनाच्या पत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे
८. वित्त विभागाच्या वाचा क्र. ६ येथील परिपत्रकातील अटींचे पालन करण्यात यावे. तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ. क्र. ९ येथे नमूद बाबींची पूर्तता करण्यात यावी.

४. सदर योजनेकरीता आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना योजनेचे नियंत्रण अधिकारी म्हणून व त्यांच्या कार्यालयातील सहायक संचालक, लेखा-१ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर निधी खर्च करतांना विहित कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे/ टेंडर नियामावली व नियमांचे/ प्रक्रियेचे/वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/P.W.D. म्यॅनूअलच्या अधिन राहून/C.V.C.तत्वानुसार/CAG च्या निर्देशानुसार/प्रचलित शासन निर्णय/नियम/परिपत्रक/ तरतुदीनुसार, बजेट व कोषागार नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अंमलबजावणी यंत्रणांनी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन निर्णय/ अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहिल.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०७.०५.२०२६ व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परिपत्रक क्र. बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

७.        सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in  या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०५२२११२८५७७२०१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

ATUL NARHARI KULKARNI

Digitally signed by ATUL NARHARI KULKARNI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=E7C5A611BC2AADC15956A0762A0B8D94BB26A280EDEEFB41F14416811A8ACC69, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F040522B06DFD4ABCDE03A7DBC281E33BB2B3CA0148639F3A48CC8D1401646D5, cn=ATUL NARHARI KULKARNI
Date: 2026.05.22 11:30:04 +05'30'

**( अतुल कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा/परिषद), महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
४. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. जमाबंदी आयुक्त तथा भूमी अभिलेख, पुणे
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. संचालक (ॲग्रिस्टॅक), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
११.सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
१२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३.सहाय्यक संचालक, लेखा -१, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४.अवर सचिव, कार्यासन १४३१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१६.निवडनस्ती (कार्यासन १०-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.